गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील ७४ पदांना दि.०१/०३/२०१९ ते दि.३०/०९/२०१९ पर्यंत चालू ठेवण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
शासन निर्णय क्रमांक: मुदतवाढ - २०१९/(५९६)/प्र.क्र.१४१/मोप्र-२
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १५/०४/२०१९

वाचा:-
१. शासन निर्णय क्र.गोवम/१०९७/(२९०/९७)/जसंअ, दि.२९/०८/१९९८.
२. जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. आढावा-१००२/(३३५/२००२)/आ(प्रशि), दि.०६/०२/२००३.
३. जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र.आढावा-२०१६/प्र.क्र.१७५/२०१६/आ(प्रशि), दि.३०/११/२०१६.
४. जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र.आढावा-२०१६/प्र.क्र.११५/२०१६/आ(प्रशि), दि.२६/०४/२०१६.
५. जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र.मुदतवाढ २०१८/(१८४१-१९९९)/ प्र.क्र.५४५/ मोप्र-२, दि.१५/११/२०१८.
६. जलसंपदा विभाग, शासन निर्णय आढावा -२०१८/ प्र.क्र.४५/ २०१८/ आस्था.(पुनर्रचना), दि.१०/०१/२०१९.
७. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद कार्यालयाचे पत्र क्र.गोमपाविम/आ-१/२६१६,दि.०५/०३/२०१९.
८. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक:पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२१/०२/२०१९.

प्रस्तावना:-

जलसंपदा विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ येथील दि.०६/०२/२००३ च्या शासन निर्णयान्वये कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद कार्यालयातील मंजूर असलेल्या नियत अस्थायी आस्थापनेवरील पदांची निर्मिती सुधारीत आकृतीबंधानुसार निश्चित करण्यात आली आहे. सदर पदांना खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात आली होती.

कार्यालयाचे नाव	नियत अस्थायी आस्थापना	मुदतवाढ कालावधी
कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.	७० पदे	दि.०१/१०/२०१८ ते दि.२८/०२/२०१९

संदर्भ क्र.८ येथील वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु ज्यांचा समावेश आकृतिबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दि.०१/०३/२०१९ ते दि.३०/०९/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याचे प्राधिकार देण्यात आले आहेत.

संदर्भ क्र.६ अन्वये कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद या कार्यालयास लेखा विषयक ४ पदे फिरवाफिरवीने उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

संदर्भ क्र.७ येथील प्रस्तावास अनुसरून, सदर पदांना दि.०१/०३/२०१९ ते दि.३०/०९/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद कार्यालयाच्या संदर्भ क्र.७ अन्वये प्रस्तावित केल्यानुसार सोबतच्या परिशिष्ट - 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील ७४ पदांना (परिशिष्ट-अ) संदर्भ क्र.८ येथील वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार, दि.०१/०३/२०१९ ते दि.३०/०९/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यास खालील अटींच्या अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

१) उपरोक्त सर्व पदे विभागाने प्रस्तावित केलेल्या कालावधीत कार्यरत असतील.
२) ही पदे आकृतीबंधानुसार मंजूर असतील व सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी रिक्त नसतील, तसेच पदे व्यपगत झालेली नसतील.
३) या सर्व पदांच्या पुढील मुदतीवाढीचा प्रस्ताव विनाविलंब सादर करावेत.
४) पुढील प्रस्ताव विहित प्रपत्रात प्रमाणपत्रासह त्या त्या कालावधीच्या दिनांकासहीत सादर करण्यात यावे.

२. सदर पदांच्या वेतनासाठी लागणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व त्याखालील मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

नियत अस्थायी आस्थापना :-

मागणी क्रमांक आय -५,
४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च ,
(८०) सर्वसाधारण,
(१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांतील गुंतवणूका,
(०४) विविध पाटबंधारे विकास महामंडळांना भाग भांडवली अंशदान (वेतन),
(०४)(०५) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान (अनिवार्य) (४७०१ आय २०४).

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय, क्र.पदनि २०१६/ प्र.क्र.८ /१६ / आ.पु.क., दि.२१/०२/२०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार आंतरवित्त सल्लागार व उप सचिव यांचे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०४१५१४३९१९३८२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Pandurang Tulshiram Kedare

Digitally signed by Pandurang Tulshiram Kedare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e594e26c6ca4bffd8b1d4e20a155e473c21b0dd40f25c25bd478079005896501, cn=Pandurang Tulshiram Kedare
Date: 2019.04.15 14:48:24 +05'30'

(पां. तु. केदारे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र : परिशिष्ट 'अ'

प्रत सहपत्रासह,

१. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.
४. मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, औरंगाबाद.
५. अधीक्षक अभियंता, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.

त्यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत शासन निर्णयान्वये मंजूरी दिलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त इतर अधिकारी/कर्मचारी यांची वेतन व देयके अदा केल्यास तसेच या शासन निर्णयान्वये दिलेल्या मंजूरीचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या चुकीचा अर्थ लावून अन्य अधिकारी/कर्मचारी यांची वेतन देयके अदा केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आहरण व संवितरण अधिका-यांवर राहील. त्याचप्रमाणे प्रस्तावात नमूद केलेले लेखाशिर्ष चुकीचे असल्याने सुधारण्यात आलेले आहे. भविष्यात प्रस्ताव पाठवितांना अचुक लेखाशिर्ष नमूद करण्याची दक्षता घ्यावी.

६. वित्त विभाग (व्यय-१२), मंत्रालय, मुंबई.
७. कार्यासन आ-(प्रशि) /अर्थ-१/आस्था. (पुनर्रचना), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. मोप्र-२ कार्यासन, जलसंपदा विभाग, निवडनस्ती.

परिशिष्ट-अ

शासन निर्णय क्र. मुदतवाढ-२०१९/(५९६)/प्र.क्र.१४१/मोप्र-२, दिनांक १५/०४/२०१९ चे सहपत्र.
दिनांक ०१/०३/२०१९ ते ३०/०९/२०१९ या कालावधीसाठी नियत अस्थायी आस्थापनेवरील ७४ पदे

अ.क्र.	कार्यालयाचे नांव	अ.क्र.	पदनाम	पदांची संख्या
१	२	३	४	५
१.०	**कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद**	१	कार्यकारी संचालक	१
		२	मुख्य लेखा व वित्त अधिकारी	१
		३	अधीक्षक अभियंता	१
		४	उप अभियंता/सहाय्यक कार्यकारी अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-१/उप विभागीय अभियंता/उप विभागीय अधिकारी	२
		५	लेखा अधिकारी	१
		६	सहायक अभियंता श्रेणी-२/शाखा अभियंता/ कनिष्ठ अभियंता	८
		७	प्रथम लिपिक	१
		८	वरिष्ठ लिपिक	८
		९	लघु टंकलेखक/निम्न श्रेणी लघुलेखक	१
		१०	स्थापत्य अभियांत्रिकी सहायक	८
		११	अनुरेखक (आरेखक श्रेणी-३)	२
		१२	कनिष्ठ लिपिक/ लिपिक-नि-टंकलेखक/ टंकलेखक	१७
		१३	वाहन चालक	४
		१४	चौकीदार	३
		१५	शिपाई	१३
		१६	सहायक लेखा अधिकारी	३
			एकुण	**७४**